Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730 AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA



Volume - IX, Issue - II,
April - June - 2020
Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# CONTENTS OF PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | आर्षवैद्यकशास्त्राची वेगळी वैशिष्ट्ये<br>**प्रा. गायकवाड पी. बी.** | १-४ |
| २ | आरोग्य संवर्धन : काळाची गरज<br>**डॉ. गजानन आनंता देवकर** | ५-८ |
| ३ | आरोग्य संकल्पनेचे सामाजिक पैलू<br>**डॉ. लेखणे एस. के.**<br>**डॉ. कहाळेकर सी. एम.** | ९-१४ |
| ४ | संसर्गजन्य आजारात प्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी व्यायामाचे महत्व एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. प्रविण प्रकाशराव दिग्रसकर** | १५-१७ |
| ५ | संस्कृत भाषेतील भैषज्य विषयक साहित्य - एक ऐतिहासिक अभ्यास<br>**डॉ. तुकाराम एकनाथराव बोकारे** | १८-२२ |
| ६ | आहार आणि आरोग्य<br>**विजय गणपतराव वारकड** | २३-२४ |
| ७ | आयुर्वेदोक्त ग्रीष्म-वर्षा ऋतुचर्या<br>**डॉ. गणंजय यज्ञेश्वरराव कहाळेकर** | २५-२८ |
| ८ | वैदिक वाङ्येषु प्रतिबिंबिता आरोग्य संकल्पना<br>**सौ. अनुया जोशी बावस्कर** | २९-३५ |
| ९ | महाभारतातील युद्धानंतरची युधिष्ठिराची मानसिक अस्वस्थता<br>**डॉ. जयश्री अनिरुध्द सकळकळे** | ३६-४२ |
| १० | आयुर्वेदस्य बलस्थानम्<br>**वैद्य महेशकुमारः निलकंठात्मजाः चौधरीउपाव्हः** | ४३-४८ |
| ११ | भासकवीचे मूल्यशिक्षण - मानसिक आरोग्याचे मार्गदर्शन<br>**प्रा. डॉ. मीनाक्षी सुभाष भांदककर** | ४९-५४ |
| १२ | बाणभट्टाच्या कादंबरीतील आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचे वर्णन<br>**नेहते मिनल अरविंद** | ५५-५७ |
| १३ | मनोचिकित्सकानि स्मृत्युक्त मूल्यानि<br>**प्रणव दर्शनानन्द चौसाळकर** | ५८-६१ |




Scanned with CamScanner

VOLUME - IX, ISSUE - II - APRIL - JUNE - 2020
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com)

# ३. आरोग्य संकल्पनेचे सामाजिक पैलू

**डॉ. लेखणे एस. के.**
लोकप्रशासन विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शंकरनगर ता. बिलोली, जि. नांदेड.
**डॉ. कहाळेकर सी. एम.**
लोकप्रशासन विभाग व संशोधन मार्गदर्शन महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड.

**प्रस्तावना**

'आरोग्य' ही मानवी व सामाजिक विकासाची महत्त्वाची बाजू आहे. मानवांच्या विकासाचे प्रारूप आरोग्याच्या पैलूशिवाय पूर्ण होत नाही. म्हणूनच मानव विकास निर्देशांकामध्ये विकासाची गती समजून घेताना आरोग्य या संकल्पनेचा आवर्जून आधार घेतला जातो. समाज व राष्ट्राच्या विकासाचाही जेव्हा विचार केला जातो तेव्हा सुद्धा त्या समाजातील आरोग्याची स्थिती विचारात घेतली जाते. सर्वसाधारणपणे रोगमुक्त अवस्था म्हणजे आरोग्य, अशी आपली धारणा असते. परंतु मानवाच्या रोगमुक्त अवस्थेला अनेक पैलू आहेत. ते सर्व पैलू विचारात घेतल्याशिवाय आरोग्याच्या संकल्पनेस पूर्णत्व येत नाही.

भारतात सर्वांसाठी आरोग्य ही घोषणा सरकारने केली अर्थात "सर्वांसाठी आरोग्य" ही आदर्श कल्पना झाली. या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्याची ही संकल्पना म्हणजे आरोग्य प्रशासनासमोर अनेक आव्हाने आहेत. या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न ही निश्चित केले जात आहेत. परंतु हे प्रयत्न विविध योजनांची अंमलबजावणी या गोष्टी ज्या प्रमाणात व्हायला हव्या तितक्या होत नाहीत. परिणामी भारतातील बालकल्याण व आरोग्याचे चित्र अत्यंत निराशाजनक आणि भयावह असे आहे. अर्थात बालकल्याण व सामाजिक आरोग्यासाठी केवळ सरकारी व प्रशासकीय पातळीवर प्रयत्न असून चालत नाही. तर समाजानेही त्यासाठी हातभार लावावा लागतो.

सामाजिक आरोग्याबद्दल समाजातही जागृतता असावी लागते. त्या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. आणि त्यामुळेच प्रस्तुत योजना किंवा "बालकल्याण आणि आरोग्य प्रशासन काळाची गरज" ही राष्ट्रीय परिषद अत्यंत महत्त्वपूर्ण ठरते. भारतातील सामाजिक आरोग्याचे चित्र काय आहे? बालकल्याण व आरोग्य प्रशासन समोरील आव्हाने कोणती आहेत त्यावर उपाययोजना कोणत्या आहेत. हे चित्र बदलण्यासाठी आपण कसा सहभागी होऊ देऊ शकतो. यावर सविस्तर चिंतन करण्याचा मी प्रयत्न आरोग्य संकल्पनेचे सामाजिक पैलू निष्कर्ष व उपाययोजना या संशोधन पत्रिकेत द्वारे करत आहे.



Scanned with CamScanner

**आरोग्य प्रशासनाचा अर्थ**

१) **जागतिक आरोग्य संघटनेच्या मते** "आरोग्य प्रशासन आरोग्य म्हणजे केवळ विकारांचा किंवा रोगांचा अभाव नाही, तर शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक सुस्थिती".

२) **एल.डी. व्हाइट यांच्या मते** " एखाद्या हेतू साध्य करण्यासाठी अनेक व्यक्तींचे संचालन संयोजन व नियंत्रण करणे म्हणजे प्रशासन होय"..

थोडक्यात आरोग्यविषयक हेतू साध्य करण्यासाठी अनेक व्यक्तींचे संचालन, संयोजन व नियंत्रण करणे म्हणजे आरोग्य प्रशासन होय. अशी आपल्याला आरोग्य प्रशासनाची सर्वसाधारण व्याख्या करता येईल.

लोकांना मिळणाऱ्या आरोग्य सुविधा डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, औषधोपचार, आरोग्य विषयक पायाभूत सुविधा या बरोबरच लोकांचे आरोग्य हे ते ज्या समाजात राहतात त्या समाजाची आर्थिक परिस्थिती सभोवतालचे वातावरण, शिक्षणाचा स्तर, समाजातील अज्ञान ,गरीबी, अंधश्रद्धा अशा अनेक बाबी लोकांच्या आरोग्याला प्रभावित करतात. प्रस्तुत लेखामध्ये आपण आरोग्य या संकल्पनेचे काही ही सामाजिक पैलू विचारात घेणार आहोत.

**आरोग्य संकल्पना स्पष्टीकरण**

जागतिक आरोग्यसंघटनेने आरोग्याची संकल्पना स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, 'आरोग्य म्हणजे केवळ रोगांचा अभाव नसून ती एक शारीरिक, मानसिक ,सामाजिक आणि अध्यात्मिक समतोलाची अवस्था आहे'.

वरील व्याख्याचे अवलोकन केल्यास हे दिसून येते की, आरोग्य या संकल्पनेचे विविध पैलू असून त्या सर्व पैलूंचा व्यक्तींच्या आरोग्यावर अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होत असतो. व्यक्ती ज्या समाजात वावरत असतो. त्या समाजातील वेगवेगळ्या व्यवस्थांचा आणि त्या व्यवस्थामधील अंतर संबंधाचा परिणाम आरोग्यावर होत असतो.

**आरोग्यावर परिणाम करणारे सामाजिक घटक**

व्यक्ती ज्या समाजाचा घटक बनून राहत असतो. त्या समाजाची संस्कृती,जीवन जगण्याच्या पद्धती व रीतीरिवाज, त्यांची आर्थिक स्थिती, शिक्षणाचे प्रमाण, अज्ञान व अंधश्रद्धा, गरिबी व दारिद्र्य अशा विविध बाबींचा व व्यक्तींच्या आरोग्याचा खूप जवळचा संबंध असतो. व्यक्तींचे आरोग्याचे अनेक प्रश्न या सामाजिक परिस्थितीमुळे उद्भवलेले दिसून येतात.

महाराष्ट्रामध्ये बालमृत्यू व माता मृत्यूच्या प्रश्नांवर खूप गांभीर्याने पाहिले जाते. युनिसेफच्या अहवालानुसार जगातील एकूण बालमृत्यूच्या एक चतुर्थांश बालमृत्यू भारतात होतात. महाराष्ट्रातील मेळघाट गडचिरोलीसारख्या आदिवासी भागात तर कुपोषण, बालमृत्यू व मात्र मृत्यूचा प्रश्न अधिकच भयावह आहे. डॉक्टर राणी बंग आणि डॉक्टर अभय बंग यांनी आपल्या सर्व या संस्थांद्वारे केलेल्या पाहणीतून लाखो मुले कुपोषणामुळे मृत्युमुखी पडतात हे समोर आले आहे. डॉक्टर अभय बंग यांनी तर 'कोवळी पानगळ' या पुस्तकातून या प्रश्नांचे अनेक सामाजिक पैलू समोर आणले आहेत. अल्पवयात होणारे विवाह लादले गेलेले मातृत्व यातून असंख्य मातामृत्यू होत असल्याचे दिसून आले आहे. याचाच अर्थ



Scanned with CamScanner

आदिवासी समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि त्यांची आदिवासी संस्कृती या सर्व सामाजिक घटकांचा त्यांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करतात हे दिसून येते.

माणसांना होणारे जे आजार आहेत. त्यांच्यातील 80 टक्के आजार हे दूषित व अशुद्ध पाणी पिल्यामुळे होतात. असे आरोग्यशास्त्र सांगते विषमज्वर, कॉलरा, हगवण, अतिसार, कावीळ ,आतड्यांचे आजार असे अनेक आजार दूषित पाण्यामुळे होतात. म्हणूनच जनतेला शुद्ध पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी शासनाची आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये उन्हाळ्यात पाण्याची किती दुर्दशा असते. हे सर्व ज्ञात आहे. टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. तेव्हा ते किती निर्जंतुक व शुद्ध केले जाते हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जसा महाराष्ट्रात गंभीर आहे. तशीच अवस्था सार्वजनिक स्वच्छतेची आहे. शासनाने संत गाडगेबाबा ग्रामीण स्वच्छता अभियान प्रभावीपणे राबविले. प्रत्येक घरात शौचालय बांधले गेले. परंतु खेडी अजूनही पूर्णतः हागणदारीमुक्त झाली नाही. कधी पाण्याचा प्रश्न तर कधी ग्रामीण जीवन शैलीमुळे स्वच्छालय याचा 90 टक्के वापर होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळे ही ग्रामीण भागातील आरोग्यविषयक प्रश्न आजही मोठ्या प्रमाणात दिसून येतात याचाच अर्थ लोकसहभाग हा सामाजिक पैलू आरोग्यावर परिणाम करताना दिसून येते.

लोकांचे आरोग्य आणि त्यांची आर्थिक स्थिती यांचाही अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. गरिबी व दारिद्र्य यामुळे लोक त्यांच्या मूलभूत गरजांपासून ही कोसोदूर असतात. सहाजिकच आरोग्यदायी वातावरणाचा अभाव त्यांच्यात दिसून येतो. ग्रामीण भागातील लोकांना शेतीचा व्यवसाय अनिश्चित उत्पन्न यामुळे गरिबी मोठ्या प्रमाणात आहे. दारिद्र्य रेषेखालील जीवन जगणाऱ्या लोकांची ही लक्षणीय प्रमाण यामुळे आहार पोषण याकडे पुरेसे लक्ष नसते. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांचा रक्ताल्पता (अनेमिया) मोठ्या प्रमाणात असते. महिलांच्या आरोग्याची अनेक प्रश्न त्यांच्या गरिबी व दारिद्र्यामुळे निर्माण होतात हे दिसून येते.

लोकं वातावरणात राहतात त्या समाजातील अज्ञान व अंधश्रद्धा आरोग्यविषयक चुकीच्या समजुती यामुळे ही त्यांच्या आरोग्याचे प्रश्न निर्माण झालेले दिसून येतात. योग्य वेळी उपचार न घेता लोक जेव्हा अंधश्रद्धेमुळे आरोग्याकडे दुर्लक्ष करतात जेव्हा आरोग्यविषयक प्रश्न गंभीर बनतात.

**आरोग्य प्रशासनासमोरील आव्हाने**

समाजातील अंधश्रद्धा,धार्मिक, सामाजिक ,रीतीरिवाज,मनोवृत्ती ,आर्थिक परिस्थिती, जीवनमान, पोषण, साक्षरता या ही घटकांमुळे प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आरोग्य प्रशासनासमोर अनेक आव्हाने निर्माण होतात.

१) सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र ही व्यवस्था नीट काम करू शकत नाही. त्याला लागणारा निधी, औषधे, डॉक्टर्स, नर्स सर्वांचाच अभाव असतो. प्राथमिक आरोग्य केंद्र बद्दल लोकांच्या मनातही अनावस्था आहे. बहुसंख्य प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णवाहिका नसते.



Scanned with CamScanner

२) वैद्यकीय सेवांचे व्यापारीकरण होण्याची पद्धत विकोपाला गेली आहे. अनैतिक, अयोग्य व बऱ्याच वेळा जनतेची पिळवणूक करणाऱ्या वैद्यकीय पद्धती मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.

३) वैद्यकीय व शास्त्रीय संशोधनात खूप प्रगती होऊन सुद्धा लोकांच्या आरोग्याच्या सुविधा यामध्ये मोठी तफावत आहे व बहुतांशी भारतीयांच्या आरोग्य यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. पराकोटीचे दारिद्र्य, एच आय व्ही, एड्स हा संसर्गजन्य रोग पुन्हा पुन्हा उद्भवणे व सार्वजनिक आरोग्य यंत्रणा दुर्बल होणे या बाबींमुळे आरोग्य क्षेत्रात मिळविलेले यश वाया जात आहे.

४) आरोग्य क्षेत्राचे खाजगीकरण करण्याने सर्वत्र पसरणाऱ्या धोरणांचा परिणाम म्हणून या क्षेत्रात शासनाची जबाबदारी कमी कमी होत जाणे. याचा गरिबावर अत्यंत विपरीत परिणाम होतो. अनियंत्रित अशा खाजगी वैद्यकीय सेवांचा सर्वत्र तुसता सुळसुळाट झाला आहे. या सेवा बहुदा गरिबांना परवडत नाहीत आणि कदाचित भरमसाठ फायदा कमी होण्यासाठी अशी सेवा देणारे अनैतिक किंवा तर्कशुद्ध मार्गाने जात असल्याची शक्यताही आहे हे आरोग्य प्रशासनाने समोरील एक आव्हान आहे

५) आरोग्य सेवा धोरणात विविध समाजाचा खरोखरी समारोप समावेश व्हावा यासाठी चा प्रचार कमी होणे आरोग्य सेवांचे योग्य नियोजन करण्याची व त्यावर नियंत्रण ठेवण्याची स्वतःची आरोग्य यंत्रणा विकसित करणे यासाठी सत्ता नसणे.

६) आरोग्य क्षेत्रांमधील प्राथमिक आरोग्याची काळजी घेण्याची पूर्वनियोजित धोरणे यशस्वीरित्या राबविण्यात आलेल्या अपयशामुळे आरोग्य प्रशासन समोरील प्रश्न अधिकच गंभीर झाले आहेत.

७) आरोग्याकडे व आरोग्य सेवांकडे पाहण्याचा संकुचित व तांत्रिक बाबीवर भर देणारा दृष्टिकोन तसेच आरोग्याची काळजी यावर मानवी हक्क या दृष्टीने न पाहता एक विकण्याची वस्तू म्हणून पाहणे

## उपाययोजना

आरोग्य ही संकल्पना केवळ आरोग्यविषयक यंत्रणा डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, औषधोपचार यांच्याशी निगडीत नसते तर तिचे अनेक सामाजिक पैलू आरोग्यावर परिणाम करतात समाजातील व कुटुंब व्यवस्थेतील अनेक घटक व त्यांच्या आंतरसंबंधाचा आरोग्यावर परिणाम होत असतो. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी आरोग्य विषयक पायाभूत सुविधा बरोबर सामाजिक सुधारणा करणे हे गरजेचे आहे.

१) सार्वजनिक आरोग्याचा दर्जा उंचावण्यासाठी लोकांना आरोग्य विषयक जनजागृती करणे आवश्यक आहे शासनाच्या उपक्रमांची व योजनांची प्रभावीपणे माहिती करून देणे आवश्यक आहे.

२) अज्ञान अंधश्रद्धा दूर करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी लोकांचा शैक्षणिक स्तर उंचावला पाहिजे.

३) लोकांचे दारिद्र्य व गरिबी दूर करण्याचे प्रभावी उपाय योजने गरजेचे आहे. ग्रामीण भागात उद्योगधंदे सुरु करून रोजगार निर्मिती करावी लोकांची आर्थिक स्थिती सुधारणे गरजेचे आहे.



Scanned with CamScanner

४) पाणीपुरवठा व स्वच्छता यांना अग्रक्रम देऊन कायमस्वरूपी व प्रभावी उपाय करावेत आता गावागावात शुद्ध पाण्याचे प्लांट सुरू झाले पाहिजेत. त्यांची व्याप्ती वाढविण्यासाठी शासनाने व जनतेने पुढाकार घेणे गरजेचे आहे.

५) गाव तेथे आरोग्यसेवा उपक्रम राबवावा प्रत्येक गावात मूलभूत आरोग्य सेवा मिळवाव्यात यासाठी ग्रामीण आरोग्य यंत्रणेचा विस्तार करण्यात यावा

६) साक्षरता मोहीम व आरोग्य शिक्षण

७) स्त्री साक्षर करणे

८) पिण्याचे शुद्ध पाणी पुरविणे

९) कचऱ्याची विल्हेवाट लावणे, सांडपाणी, गटार योजना राबविने

१०) बालकाचे लसीकरण, वृद्धाचे मोतीबिंदू निवारण याकडे लक्ष देणे

११) शालेय आरोग्य तपासणी व तिचा पाठ पुरवठा होणे.

१२) लोकसंख्या नियंत्रणाचे भगीरथ प्रयत्न करणे.

१३) सार्वजनिक आरोग्याच्या पायाभूत सुविधा मजबूत करणे व सेवांचा दर्जा सुधारणे.

१४) आरोग्य सेवांची किमान गुणवत्ता ठरविण्यात यावे.

आरोग्याची काळजी घेण्यासाठी चे उपचार केले जातील त्यांच्यासाठी तर्कशुद्ध मार्गदर्शक तत्त्वे ठरवून दिली जावीत व त्यात खाजगी वैद्यकीय किमतीवर मर्यादा ठरल्या जाव्यात तसेच खाजगी वैद्यकीय सेवेचा दर्जा नियंत्रित करण्यात यावा

**निष्कर्ष**

भारतीय राज्यघटनेमध्ये लोकांच्या कल्याणासाठी विशेष तरतूद केलेली आहे. प्रत्येक देशातील आरोग्य महत्वाचे मानले जाते जनतेच्या विकासाची जबाबदारी सरकारची व कुटुंबाची असते. आजच्या स्थितीत एकूण लोकसंख्येपैकी 34 टक्के लोकसंख्या ही बालकांची आहे त्यामुळे त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. या सर्वांसाठी साक्षरता मोहीम राबविणे, स्त्रियांची आरोग्य विषयक जागृती करणे, शुद्ध पाणीपुरवठा करणे, स्वच्छता पाळणे, बालकांचे लसीकरण करणे, लोकसंख्या नियंत्रणात ठेवणे, आरोग्यविषयक साधनांचा दर्जा सुधारणे, तसेच आर्थिक दृष्ट्या कमकुवत नागरिकांना विनाशुल्क आरोग्यविषयक सुविधा पुरविणे इत्यादी माध्यमांद्वारे आरोग्य कल्याण साधले जाऊ शकते व आरोग्यविषयक समस्या सोडविल्या जाऊ शकतात. यासाठी सरकार, संस्था , समाज सुधारक, कुटुंबातील सदस्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कारण ही केवळ एकट्या सरकारची जबाबदारी नाही. प्रत्येक ठिकाणी सरकार एकटेच समर्थपणे कार्य करू शकत नाही. कारण सरकारच्या देखील काही मर्यादा असू शकतात. त्यामुळे यामध्ये प्रत्येकानी सहकार्य करणे आवश्यक आहे. कारण ती प्रत्येकांची एक नैतिक जबाबदारी आहे व त्या दृष्टीने प्रत्येकांचे आपले योगदान एक कर्तव्य म्हणून द्यावे ही अपेक्षा असते असे म्हटल्यास चूक ठरू नये.



Scanned with CamScanner

संदर्भ सूची


- जोशी लक्ष्मणशास्त्री मराठी विश्वकोश खंड 12, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई 1995
- Balan K.health for all by 2000 A.D.,Asshish Pub.House ,New Delhi-1989
- Goel S.L.Health case management, Deep& Deep Pub. New Delhi-2001
- https//mr.vikaspedia.in
- shodhganga.infebnet.ac.in
- https//maharashtratimes.com
- ७ जीवनाचा मंत्र- युनिसेफ, भारत कार्यालय,नवी दिल्ली
- युनिसेफ, -"चाइल्ड ॲटलास ऑफ इंडिया" यूनिसेफ, 1981
- चाइल्ड टू चाइल्ड- " ए फेरणस आणि याच कॅनिकल प्रेस 1979
- अखिल भारतीय वैद्यक शास्त्र संस्था," इंटिग्रेटेड चाईल्ड डेव्हलपमेंट सर्विसेस", नवी दिल्ली 1982
- समाज कल्याण मंत्रालय, "गाईडलाईन्स अंड इन्स्ट्रक्शन - इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्विसेस , भारत सरकार 1982
- योजना जुलै 2005 माहिती व प्रसारण मंत्रालय भारत सरकार
- योजना नोव्हेंबर 2006 माहिती प्रसारण मंत्रालय भारत सरकार
- मराठी विश्वकोष खंड 17 महाराष्ट्र राज्य